# महात्मा गांधी आणि विश्वस्त संकल्पना

**किरण पाटील,** संशोधक विध्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

---

**प्रस्तावना :**

गांधीवादाचे चार प्रमुख आयाम मानले जातात. त्यामध्ये सत्य, अहिंसा,स्वावलंबन आणि विश्वस्तता होय. गांधीवाद हा महात्मा गांधींच्या त्या राजकीय आणि सामाजिक विचारांवर आधारित आहे.ज्यांचा त्यांनी प्रथम व्यवहारात वापर केला आणि व्यवहारात गुणवत्ता मिळाल्यानंतर त्यांना सिद्धांताचे स्वरूप देऊन सार्वजनिक केले. १९०३ मध्ये महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेत असताना त्यांनी विश्वस्तपदाचा सिद्धांत मांडला. गांधीजींच्या विश्वस्ततेच्या तत्त्वाच्या मुळाशी भांडवलाचा खरा मालक हा भांडवलदार नसून संपूर्ण समाज असतो, भांडवलदार हा केवळ त्या मालमत्तेचा संरक्षक असतो. जी संपत्ती भांडवलदारांकडे आहे,ती वारसा म्हणून त्यांच्याकडे आहे,असे गांधीजींचे मत होते. महात्मा गांधी म्हणाले की,भांडवलशाहीमुळे जगभरात बेरोजगारी वाढली असून श्रमाचे महत्त्व कमी झाले आहे. बेरोजगारीमुळे समाजातील सर्वात लहान घटक कमकुवत झाला आहे. जर श्रीमंतांनी स्वेच्छेने आपली संपत्ती आणि त्यातून मिळवलेली शक्ती सोडली नाही आणि सामान्य जनतेला त्यांच्या कार्यात भागीदार केले नाही तर एक दिवस नक्कीच हिंसक आणि रक्तरंजित क्रांती होईल. या सर्व समस्यांचे समाधान विश्वस्त तत्त्वात आहे, असे महात्मा गांधी यांनी विचार मांडले आहेत.

**उद्देश :**

१. 'विश्वस्त' संकल्पनाचा अभ्यास करणे

२. महात्मा गांधी यांची विश्वस्त संकल्पना विषयक विचाराचा अभ्यास करणे

३. महात्मा गांधी यांच्या विश्वस्त संकल्पनेचे समकालीन महत्व अभ्यासने

**'विश्वस्त' संकल्पना :**

'विश्वस्त'ही एक संकल्पना आहे. ज्यावेळी एखाद्या मालमत्तेचे प्रशासन किंवा विनियोग विशिष्ट हेतूने केला जावा असे अभिप्रेत असते,त्यावेळी ज्या व्यक्तीस प्रशासनाची किंवा विनियोगाची क्षमता दिलेली असेलकिंवा सुपूर्द केलेली असेल त्या व्यक्तीस 'विश्वस्त' असे म्हटले जाते. विश्वस्ताचे कर्तव्य हे असते, कीन्यासाच्या उद्दिष्टांप्रमाणे त्या मालमत्तेचे प्रशासन आणि विनियोग व्हावा. विश्वस्ताचा त्या मालमत्तेवर संपूर्ण ताबा असतोपण त्या मालमत्तेचे स्वामित्व मात्र त्याच्याकडे नसते. ही मालमत्ता वस्तूच्या स्वरूपात असेलकिंवा पैशाच्या स्वरूपात असेल.

**महात्मा गांधी**

म.गांधीजींनी श्रम-भांडवल संबंधावर विचार करूनगांधीजी दोघांमधील सहकार्य आणि परस्पर संबंधांबद्दल विचार करतात. आदर्श परिस्थितीच्या रूपात ते श्रम भांडवल एकमेकांना समानार्थी बनवतात,परंतु वास्तविक परिस्थितीत तसे न झाल्यास त्या आदर्शाकडे वाटचाल करण्यासाठी उपाय देखील ते सुचवतात. त्याचप्रमाणे,मालकीच्या समस्येचा विचार करून,त्यांनी विश्वस्ततेचे तत्त्व मांडले आहे. ही तत्त्वे त्यांच्या जीवनाच्या तत्त्वज्ञानातून उद्भवली आहेत ज्यात पूर्व आणि पाश्चात्य सांस्कृतिक वारसा आहे जो आध्यात्मिक आणि धार्मिक आणि नैतिक आणि सामाजिक आहे. त्यामुळे म. गांधीजींचची विश्वस्तहे एक सामाजिक-आर्थिक तत्वज्ञान आहे जे गांधीजींनी मांडले होते. हे श्रीमंत लोकांना एक माध्यम प्रदान करते ज्याद्वारे ते गरीब आणि असहाय लोकांना मदत करू शकतात. महात्मा गांधीनी श्रीमंतांनी संपत्तीचे विश्वस्त व्हावे, स्वामी होऊ नयेअशी कल्पना मांडली होती. याचा अर्थ श्रीमंतांनी आपली मालमत्ता लोकहितार्थ वापरावीकेवळ स्वत:च्या उपभोगासाठी वापरू नयेअसे त्यांना अभिप्रेत होते.ही शिकवण गांधींची आध्यात्मिक वाढ प्रतिबिंबित करते,जी त्यांच्यामध्ये थिऑसॉफिकल साहित्य आणि भगवद्गीतेच्या अभ्यासातून विकसित झाली.

महात्मा गांधींच्या विश्वस्तत्वाच्या सिद्धांताला विचारवंतांच्या एका मोठ्या वर्गाने काल्पनिक आदर्शवाद म्हणून अव्यवहार्य म्हटले होते. त्यांच्या विश्वस्त तत्त्वाची अनेक लोक खिल्ली उडवत असत. पण गांधीजींना त्यांच्या विश्वस्त तत्त्वावर विश्वास होता. म्हणूनच त्यांनी भांडवलदार आणि श्रीमंत लोकांच्या भेटी घेऊन ट्रस्टीशिप तत्त्व

समजावून सांगण्यास सुरुवात केली आणि त्यांच्या अंमलबजावणीसाठी सहमती देण्यास त्यांना मोठ्या प्रमाणात यश मिळाले. महात्मा गांधींच्या विश्वस्त तत्त्वाशी सहमत असलेल्या शेकडो उद्योगपतींनी धर्मादाय ट्रस्ट आणि फाउंडेशनची स्थापना केली आणि डझनभर शैक्षणिक संस्था,रुग्णालये,तलाव बांधले. विश्वस्त तत्त्वाचे पालन करणाऱ्या शेकडो उद्योगपतींपैकी जमनालाल बजाज,जे आपल्या कुटुंबासह साधे जीवन जगतात,हे महात्मा गांधींचे सर्वात लाडके उद्योगपती शिष्य मानले जातात.

**महात्मा गांधी यांच्या विश्वस्त संकल्पनेचे समकालीन महत्व:**

गांधीविचारातील महत्त्वाचा घटक म्हणून 'विश्वस्त' या संकल्पनेचा उल्लेखहोत असतोपण गांधीजींच्या अनेक संकल्पनांची टिंगलटवाळी झाली तशीच काहीप्रमाणात 'विश्वस्त'या संकल्पनेचीसुद्धा झाली आणि आजही होत असते. असे असले तरी तिची महत्व कमी होत नाही. आजच्या जागतिकीकरणाच्या युगात गांधीजींची विश्वस्त संकल्पना उपयुक्त आहे.महात्मा गांधींचे विश्वस्त तत्त्व हे सत्ता, मालमत्ता आणि मक्तेदारी विरुद्ध लोकशाही चळवळीचे प्रतीक आहे. औद्योगिक क्षेत्रात महात्मा गांधी भांडवलशाहीच्या बाजूने नाहीत किंवा राज्य नियंत्रणाच्या बहाण्याने नोकरशाहीच्या बाजूने नाहीत, कारण दोन्हीचा आधार शोषण आणि हिंसा आहे.गांधींच्या दृष्टीने विश्वस्त तत्त्व हे वेगळे नाही,त्याच्याशी विधायक कार्यक्रम जोडलेला आहे. विश्वस्ततत्त्व आणि रचनात्मक कार्यक्रम आर्थिक आणि राजकीय शक्तीच्या वितरणासाठी क्रांतिकारक परिणाम देतात. उच्चभ्रू वर्गाच्या औचित्याच्या आधारे बदल घडवून आणण्यासाठी विश्वस्तएक घटक आहे. त्यातून आमूलाग्र बदलाला चालना मिळाली आहे.

**निष्कर्ष :**

महात्मा गांधी समाजातून विषमता नष्ट करून आर्थिक क्षमता प्रस्थापित करण्याच्या बाजूने होते. त्यांना समाजात अंगमेहनतीला प्रतिष्ठा हवी होती आणि समाजातील प्रत्येक व्यवसायात गुंतलेल्या लोकांना समान सन्मान व मोबदला मिळावा आणि हे ध्येय हिंसेने नव्हे तर अहिंसेने साध्य व्हावे अशी त्यांची इच्छा होती. त्यामुळे त्यांनी विश्वस्तपदाच्या तत्त्वाला महत्त्व दिले. या सिद्धांतानुसारउत्पादन प्रक्रियेत गुंतलेले समाजातील विविध घटक सामाजिकदृष्ट्या जबाबदार व्यवस्थापक म्हणून काम करतील,म्हणजे भांडवलदार,मजूर,कामगार,जमीनदार,शेतकरी आणि सरकारसर्वांनी अशा प्रकारे कार्य केले पाहिजे की अधिक उत्पादन वाढेल. अधिकाधिक समाजाचे कल्याण होवो गांधीजींच्या मते,केवळ देशाचीच नव्हे तर जगाची अर्थव्यवस्था अशी असावी की, कोणालाही भाकरी-कपडा कमी पडू नये,म्हणजेच प्रत्येकाला त्याच्या मूलभूत गरजा पूर्ण करता येतील एवढे मिळावे आणि हे उद्दिष्ट केवळ शक्य आहे. जेव्हा जीवनाच्या मूलभूत गरजा पूर्ण होतात तेव्हा आवश्यक वस्तूंच्या उत्पादनाची साधने लोकांच्या नियंत्रणाखाली असावीत. यामुळे गांधीजींची विश्वस्त विचारधारा सध्याच्या काळात अत्यंत समर्पक आहे,जेव्हा गरिबी आणि भूक जगभर आपली छाया पसरत आहे. संपत्ती आणि उत्पादनाच्या साधनांवर सामुहिक नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी ट्रस्टसदृश व्यवस्था स्थापन करावी या गांधीजींच्या विचाराला खूप महत्त्व आहे.

**संदर्भ :**

१.भाऊ धर्माधिकारी , "गांधी विचार दर्शन", गांधी वाड्मय प्रकाशन समिती,१९६३

२.बाळासाहेब भारत , 'गांधी विचार दर्शन ', महाराष्ट्र गांधी स्मारक, गांधी भवन , पुणे ,१९९४

३.मिश्रा एम.के., 'गांधी दर्शन', अर्जुन पब्लिकेशन , दिल्ली,२०११.

४.महाराष्ट्र टाईम्सवृत्तमानपत्र

५.सकाळ वृत्तमानपत्र